**MHKO100002732015**

## आदेश निशाणी क्र. ५५

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ८ श्री. ननूसाहेब आप्पालाल मुल्ला हे दिनांक ०८/०४/२०२३ रोजी मयत झाले असलेने त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व प्रतिवादी यांनी निशाणी क्र. ५६ येथे दिलेले म्हणणे वाचले. त्याचे असे म्हणणे आहे की, अर्जातील सर्व मजकुर चुकीचा व खोटा आहे. वादी यांनी अर्जामध्ये प्रतिवादी क्र. ८ किंवा प्रतिवदी क्र. ९ असा उल्लेख केलेला आहे. सदर अर्जावरुन प्रतिवादी क्र. ८ किंवा प्रतिवादी क्र. ९ चे वारस याबाबत संदिग्धता निर्माण होते. सबब सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. वादी यांनी सदरचा दावा फिल्ड पाडून मिळणेसाठी दाखल केला आहे. सदरचा अर्ज हा दिनांक ०८/०६/२०२३ रोजी प्रकरणात दाखल केलेला आहे. म्हणजेच प्रतिवादी क्र. ८ ननूसाहेब आप्पालाल मुल्ला यांच्या मृत्यूनंतर ९० दिवसात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे व तो मुदतीत आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. परिणामतः खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२. वादी यांनी दाव्यात १४ दिवसांचे आत दुरुस्ती करावी व दाव्याची दुरुस्ती प्रत दाखल करुन पुढील पुर्तता सत्वर करावी.
३. अर्जाचा खर्च मुळ अर्जात समाविष्ठ करणेत येत आहे.

DHANASHRI MAHADEV PAWAR
Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2023.07.07 13:19:31 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०६/०७/२०२३

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज